दिनांक 29/08/2022

**प्रसिध्दी पत्रक**

**आ.लो.से. श्री. संजीत उत्तमराव कवटकर, वय 45 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-भुमापक, रा. पहाडी बिडींग, एन-2, शनिचौक सिडको औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.2000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वैजापुर,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. संजीत उत्तमराव कवटकर, वय 45 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद- भुमापक, रा. पहाडी बिडींग, एन-2, शनिचौक सिडको औरंगाबाद. (वर्ग-3) |
| लाच मागणी रक्कम | :- | 4000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 2000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. रुपचंद वाघमारे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे पक्षकाराचे जमिनीची हद्द कायम मोजणी करुन मोजणी नकाशा देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे पक्षकाराचे जमिनीची हद्द कायम मोजणी करुन मोजणी नकाशा देण्यासाठी तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कडे तक्रादार देण्यापुर्वी आ.लो.से.यांनी 3000/- रुपये स्विकारले होते व उर्वरीत 4000/- रुपये करिता तक्रारदार यांच्याकडे तगादा लावल्याने आ.लो.से. संजीत कवटकर यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से. यांनी 4000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 29/08/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. संजीत कवटकर यांनी पंच साक्षीदारासमक्ष ठरलेली लाचेची रक्कम 4000/- रुपये मागणी करुन त्यापैकी पहिला हसा म्हणून लाचेची रक्कम 2000/- रु. भुमीअभिलेख कार्यालय गेट वैजापुर समोर स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. वैजापुर,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक रुपचंद वाघमारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं/विलास चव्हाण, दिगंबर पाठक, भिमराज जिवडे, चालक- चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com